www.attalmat.com
# अट्टलमत
RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23
■ वर्ष –19, अंक–41 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 15 जून 2026 ■ किंमत 2 रुपये, पाने –4

**कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला मोठा दिलासा!**

**महसूल मंत्री बावनकुळे यांनी थेट जीआरच काढला**



पान ४ वर

# शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव : ‘शाळा प्रवेशोत्सव’

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील सर्व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे तसेच शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे या उद्देशाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने ‘शाळा प्रवेशोत्सव’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात केल्यास त्यांचा उत्साह द्विगुणित होईल आणि शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात होईल. यासाठी विदर्भातील शाळा वगळता उर्वरित महाराष्ट्रात यंदाचा ‘शाळा प्रवेशोत्सव’ १५ जून २०२६ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. या पार्श्वभूमीवर शाळा प्रवेशोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, पालकांचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सवासाठी व्यापक नियोजन केले असून राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी राज्यभरातील विविध शाळांना भेट देऊन नवागत




विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. मागील वर्षी राबविण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवामुळे शाळांमधील पटसंख्येतील घट कमी होण्यास मदत झाली. काही जिल्ह्यांमध्ये मागील वर्षांच्या तुलनेत पटसंख्येत वाढही दिसून आली. या सकारात्मक परिणामांच्या आधारे यंदा अधिक व्यापक आणि परिणामकारक पद्धतीने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शाळा प्रवेशोत्सवांतर्गत प्रत्येक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे. ‘पहिले पाऊल’ या संकल्पनेअंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना दिली जाणार आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण करण्यात येणार असून शाळेचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा केला जाणार आहे. या उपक्रमात लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची सक्रिय भूमिका निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याने किमान एका शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करायचे असून संबंधित अधिकाऱ्यांनी शाळा वर्षभरासाठी ‘दत्तक शाळा’ म्हणून स्वीकारून तेथील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यायचा आहे. यामुळे शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी परिसरातील अंगणवाडी व बालवाडी केंद्रांना भेट देऊन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी, पालकांशी संवाद साधावा आणि शासकीय शाळांमधील विविध सुविधा, शिष्यवृत्ती, नाविन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. समाजमाध्यमे, ग्रामस्तरीय जनजागृती, दवंडी आणि पालकांच्या व्हॉट्सअ‍ॅप गटांद्वारेही शाळा सुरू होण्याबाबत व्यापक प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे. यंदाच्या प्रवेशोत्सवासाठी जिल्हास्तरावर विशेष नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली असून ‘शाळा प्रवेशोत्सव कक्ष’ स्थापन करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाणार आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या शाळा भेटींची माहिती, छायाचित्रे आणि अहवाल ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदविले जाणार आहेत. शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो. शाळा प्रवेशोत्सव २०२६ हा उपक्रम विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते अधिक दृढ करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण, वाढती उपस्थिती आणि सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शासन, प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांच्या संयुक्त सहभागातून प्रत्येक बालक शिक्षणाच्या प्रवाहात यावे, हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू असून त्याद्वारे ‘शिक्षणसमृद्ध महाराष्ट्र’ घडविण्याच्या दिशेने आणखी एक सकारात्मक पाऊल टाकले जात आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर एनडीएच्या पहिल्या बॅचमध्ये १४ महिला अधिकारी सज्ज

डेहरादून : सर्वोच्च न्यायालयाच्या २०२१ मधील ऐतिहासिक निर्णयामुळे नॅशनल डिफेन्स अकादमीमध्ये (एनडीए) महिलांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. यानुसार, एनडीएच्या पहिल्या महिला तुकडीतील १४ कॅडेट्सनी कठोर प्रशिक्षण पूर्ण करून आर्मी आणि एअरफोर्समध्ये अधिकारी म्हणून यशस्वीरित्या पदभार स्वीकारला आहे.

सात दशकांहून अधिक काळ फक्त पुरुषांसाठी खुले असलेल्या राष्ट्रीय रक्षा अकादमी (एनडीए) मधून प्रशिक्षण घेतलेल्या पहिल्या महिला बॅचमधील १४ कॅडेट्स आता लष्कर आणि वायुदलात अधिकारी पदावर सज्ज झाल्या. इंडियन मिलिटरी अकादमी (आयएमए), देहरादून येथे नुकत्याच झालेल्या पासिंग आऊट परेडमध्ये ९ महिला कॅडेट्सची लेफ्टनंट म्हणून नियुक्ती करण्यात आली.भारतीय वायुसेना (इंडियन एअर फोर्स) हैद्राबाद येथील एअर फोर्स अकादमी (एफए), डुंडीगल येथे ५ महिला कॅडेट्स फ्लाइंग ऑफिसर म्हणून कमीशन झाल्या. या सर्व महिला अधिकाऱ्यांना थेट परमनंट कमिशन देण्यात आले. विशेष म्हणजे या पहिल्या महिला अधिकारी आहेत ज्यांना एनडीएच्या माध्यमातून पहिल्या दिवसापासूनच कायम स्वरूपी कमिशन मिळाले. त्यांचा प्रवास २०२१ मध्ये सुरू झाला, जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महिलांसाठी एनडीएचे दरवाजे उघडले गेले. यापूर्वी लष्कर आणि वायुदलात महिला अधिकारी शॉर्ट सर्व्हिस कमिशन (एसएससी) द्वारे



प्रवेश करत असत. एनडीए–आयएमए आणि एनडीए–एएफए मार्गे येणाऱ्या अधिकाऱ्यांना सुरुवातीपासूनच कायमस्वरूपी कमिशन मिळते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत झालेल्या या ऐतिहासिक सोहळ्यात, एकूण ५१५ जेंटलमन कॅडेट्सनी अंतिम टप्पा पार करून लष्करी जीवनाच्या नव्या पर्वाला सुरुवात केली. आयएमएच्या पासिंग आउट परेडमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पाहणी केली, तर एअर फोर्स अकादमीच्या परेडला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते.

**भारतीय लष्कराच्या ड्रेस कोडमध्ये बदल; नवीन युनिफॉर्म श्रेणींचा समावेश**

भारतीय लष्कराच्या गणवेश नियमावलीत सुधारणा करण्यात आले असून विविध प्रसंगी वापरल्या जाणाऱ्या गणवेशामध्ये काही नवीन ड्रेस जोडण्यात आले. समारंभीय हिवाळी गणवेशमध्ये आता जवान आणि अधिकाऱ्यांसाठी एकच समान ड्रेस असणार आहे. अधिकाऱ्यांसाठी नवीन विंटर जॅकेटही युनिफॉर्ममध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

नव्या नियमांनुसार अधिकाऱ्यांसाठी नवीन हिवाळी जॅकेटचा समावेश करण्यात आला असून ड्रेसीड्ढ नावाचा नवीन हिवाळी गणवेश प्रकार लागू करण्यात आला आहे. या गणवेशात आधुनिक हिवाळी जॅकेटचा समावेश आहे. हे जॅकेट सध्या भारतीय हवाई दल आणि नौदलात वापरले जात होते आणि आता ते लष्करातही समाविष्ट करण्यात आले आहे.

# गरोदर माता व बालकांना टीएचआर आहार वेळेवर व दर्जेदार मिळावा : मीनाक्षी पवार



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात महिला व बालकल्याण विकास विभागाची आढावा बैठक नुकतीच उत्साहात पार पडली. या बैठकीत गरोदर माता, स्तनदा माता तसेच सहा महिने ते तीन वर्षांपर्यंतच्या बालकांना दिल्या जाणाऱ्या टेक होम रेशन (टीएचआर) आहाराच्या वितरणाचा आढावा घेण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती मीनाक्षी पवार यांनी लाभार्थ्यांना टीएचआर आहार वेळेवर, नियमित आणि दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

> **पोषण आहार वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याच्या सूचना**

बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना सभापती मीनाक्षी पवार म्हणाल्या की, ग्रामीण भागातील महिला आणि बालकांच्या पोषणासाठी शासन विविध योजना राबवत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी प्रत्येक गावात झाली पाहिजे. तसेच शासनाच्या सर्व योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने आणि दक्षतेने काम करावे.

पोषण आहार वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. लाभार्थ्यांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण आहार मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील बाल विकास अधिकारी, पर्यवेक्षिका तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी विविध प्रशासकीय व कार्यान्वयनाशी संबंधित प्रश्न मांडले. या प्रश्नांवर सभापती मीनाक्षी पवार यांनी सविस्तर चर्चा करत अधिकाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले व आवश्यक मार्गदर्शन केले.

महिला व बालकांच्या आरोग्य व पोषणाच्या दृष्टीने शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीस जिल्ह्यातील बाल विकास अधिकारी, पर्यवेक्षिका आणि महिला व बालकल्याण विभागाचे संबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेशन बिल्डर:गृहिणी !

**कधी** काळी मातृसत्ताक राज्य पद्धती असलेला आपल्या देशात काळाच्या ओघात पुरूषप्रधान संस्कृतीचा शिरकाव झाला आणि सर्वत्र पुरूषसत्ताक कुटुंब व्यवस्था रूळली आणि रूजली. नंतरच्या काळात स्त्रियांना बरोबरीचा दर्जा राहीला नाही. जगभरात स्त्रियांना आपल्या हक्कासाठी आंदोलन करावी लागली. आपल्या देशात संविधानाने समान हक्क मान्य केला असला तरी आज समान वागणूक हा प्रश्न आहे. सोबत महिला मुक्ती तसेच महिला तसेच महिला सबलीकरण यावर देखील चर्चा होते. या बाबत सर्वोच्च न्यायालयाने एका अपघात विमा प्रकरणात ऐतिहासिक निवाडा दिला आहे तो महत्वाचा आहे. याद्वारे महिलांना गृहिणी न म्हणता राष्ट्र निर्मितीमधील एक व्यक्ती म्हणून मान्यता द्यावी असे भाष्य केले आहे.

साधारणपणे गृहिणीचे स्थान घराघरात रांधा-वाढा-उष्टी काढा इतपत मानले जाते. ती गृहिणी व्यक्ती म्हूणन जगताना जी विविध नाती जपते आणि त्या निमित्ताने जे कष्ट उपसत असते त्याचे मोल केले जात नाही. हे वास्तव नाकारता येणार नाही. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' असं आपण म्हणतो तर दुसरीकडे मुलगी शिकली प्रगती झाली:असही सांगतो. सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिला त्याचा संदर्भ अपघात विमा दाव्याशी संदर्भ ठेवून आहे. घरातील एखादा कर्ता पुरूष अपघातात मरण पावला तर त्याचं वय, कमाई आणि अपेक्षित जीवनमान याच्या आधारे भरपाईची रक्कम ठरविली जाते.



– प्रशांत दैठणकर

अपघातात मरण पावलेली माहिला कमावती नसेल आणि ती केवळ गृहिणी असेल तर भरपाईचे मोजमापच नाही. म्हणूनच हा निवाडा महत्वाचा आहे. घरात असणारी सर्व प्रकारची कामे, तसेच मुलांचे संगोपन, शिक्षण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्कार देण्यात गृहिणीचा मोठा वाटा असतो. पुरूषाने फक्त नोकरी-व्यवसाय करुन कुटूंबाच्या निर्वाहासाठी पैसा कमावणं इतकच आपला समाज मानतो. घरातील या कामांसाठी महिलांना पत्नी म्हणून पगार देणारा पती हा प्रकार आपल्याकडे नाही. त्यामुळे गृहिणी म्हणून ती व्यक्ती, ती स्त्री, आपल सर्वस्व झोकून देऊन नवी पिढी घडवत असते. प्रसंगी स्वत: उपाशी राहून मुलांसाठी अन्नपाण्याची व्यवस्था करते. या अर्थाने ती नवी पिढी घडविण्याचे राष्ट्रीय कार्य करते. म्हणून तीला 'नेशन बिल्डर' चा दर्जा असावा असे निरीक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे.

आपण जर आपल्या आयुष्यात जरा वळून बघितल तर जानवेल की ती गृहिणी म्हणून घरात वावरताना पत्नी, सून, आई, या विविध नात्यांची गुंफण जपत स्वत:ची पर्वा न करता आणि कोणत्याही आभाराची अपेक्षा न करता राबते आणि अगदी घरातील व्यक्ती म्हणून वावरताना ती सतत टोमणे सहन करीत असते. मुलं देखील हॉटेलमध्ये ऑर्डर द्यावी तशी खाण्यासाठी 'ऑर्डर' सोडतात. हे घराघरातल चित्र आहे. नाही म्हणायला तिचा मोठेपणा मिरवायला हल्ली ग्रिटींग कार्ड, केक आाि पार्टीच्या माध्यमातून 'मदर्स डे' साजरा केला जातो. घरातील स्त्रिया माता म्हणून मिळणारा मान वगळता इतर बाबतीत तिचं आणि तिच्या कामाचं महत्व दुर्लक्षित होत. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीवर सर्व अवलंबून असतात असे नव्हे तर कुटुंबातील कमावत्या सदस्यासोबतच सारं कुटुंब तिच्यावर अवलंबून असतं म्हणून ती 'नेशन बिल्डर'. 'मातृ देवो भव' म्हणायचं, सण, उत्सवात दुर्गा व इतर देवींची पुजा करतो मात्र घरातलं दैवत वंचित राहतं. न्यायालयाच्या या निर्णयानं या निमित्तानं एक नवा विचार समोर आणला आहे आणि GenZ सह सर्वांनाच तो मान्य असावा.

# जि.प. शिक्षकाच्या मृत्यूने गाव हादरलं

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. फक्त किरकोळ वादातून निष्पाप शिक्षकाला आपला जीव गमवावा लागला आहे असा आरोप मृत शिक्षकांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

१० ते १५ जणांच्या जमावाकडून शिक्षकाला बेदम मारहाण- वेरूळ येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले शिक्षक सुरेश रूपचंद बोरसे यांचा मध्यरात्री झालेल्या वादानंतर मृत्यू झाला आहे. बुधवारी रात्री त्यांच्या घराबाहेर मोठा गोंधळ सुरू असल्याचा आवाज ऐकून शिक्षक सुरेश बोरसे बाहेर आले. यावेळी काही जण मद्यप्राशन करून धिंगाणा घालत असल्याचं दिसून आलं. बोरसे यांनी त्यांना समज देण्याचा प्रयत्न केला. मात्र, याचाच राग आल्याने १० ते १५ जणांच्या जमावाने त्यांच्यावर बेदम हल्ला केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या हल्ल्यात जखमी झालेल्या सुरेश बोरसे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मृत शिक्षकांच्या कुटुंबीयांनी केली आहे.

दरम्यान पोस्टमार्टममध्ये शिक्षकाचा मृत्यू हृदय विकाराच्या झटक्याने झाला असा दावा पोलिसांनी केला आहे. तर शिक्षकाला मारहाण झाली नसल्याची माहिती छत्रपती संभाजी नगर ग्रामीण पोलिसांनी दिली आहे. दरम्यान याबाबत सखोल तपास सुरू आहे. कुणी दोषी असेल तर त्यावर कारवाई करण्यात येईल असं पोलिसांचं म्हणणं आहे. दरम्यान कारवाईच्या मागणीसाठी मृताच्या नातेवाईकांकडून रास्ता रोको करण्यात आला. यावेळी ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे देखील उपस्थित होते. पोलिसांच्या भूमिकेमुळे शिक्षकाचा हृदयविकाराने झटका येऊन मृत्यू झाला असा दावा करण्यात आल्याचं दानवेंनी म्हटलं आहे.

# याचि दृष्टी, याचि डोळा: पाहू सृष्टी, दोन वेळा

**आपल्यालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल, तर आपण आपल्या नजीकच्या नेत्रदान हॉस्पिटलमध्ये संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदणी करू शकतो. नेत्रदान ही संकल्पना राबविण्याचा दिवस म्हणजे जागतिक दृष्टीदान दिवस होय. प्रत्येक व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केल्यास मोठ्या प्रमाणात जगातील नेत्रहीन व्यक्तींच्या दृष्टींना प्रकाशमान करु शकू. आजच्या काळात नेत्रदान संकल्पाचा विचार आणि आचार सामान्य माणसाच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे. महत्त्वपूर्ण व ज्ञानवर्धक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख जरूर अभ्यासा... संपादक.**

मानवी जीवनात मरणोत्तर डोळेच फक्त अंधाना मदत करू शकतात. तेव्हा दृष्टी दानामुळे एक माणूस दुसऱ्या अंध माणसाचे जीवन प्रकाशमय करून त्याला सामान्य जीवन जगण्यास मदत करु शकतो. नेत्रदानाची प्रक्रिया मृत्युच्या काही तासांत-शक्यतो व्यक्तीच्या मृत्यूनंतर सहा तासांच्या आत करण्यात येते. नेत्रदानाचा निर्णय घेतलेल्या एका मृतव्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येतात. त्यामुळे त्या अंधव्यक्तीचे जीवन प्रकाशमय होते. आपल्यालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल, तर आपण आपल्या नजीकच्या नेत्रदान हॉस्पिटलमध्ये संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदणी करू शकतो. नेत्रदान ही संकल्पना राबविण्याचा दिवस म्हणजे जागतिक दृष्टीदान दिवस होय. प्रत्येक व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केल्यास मोठ्या प्रमाणात जगातील नेत्रहीन व्यक्तींच्या दृष्टींना प्रकाशमान करु शकू. आजच्या काळात नेत्रदान संकल्पाचा विचार आणि आचार सामान्य माणसाच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे.

अलीकडे दृष्टीला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. दृष्टी या शब्दावरून अलीकडे बऱ्याच प्रमाणात टोमणे मारता येतात. सरकारला दृष्टी नाही, जाणूनबुजून धृतराष्ट्राची भूमिका घेत आहे; तसेच प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांना 'भावी काळात दूरदृष्टी ठेवून भावी जीवनात कोण व्हायचे आहे, हे ठरवून वाटचाल कर!' असे सतत खुणावत असतात. एकंदरित काय? तर दृष्टी ही फार महत्त्वाची आहे. कलियुगात दानाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. अवयवदान, रक्तदान, नेत्रदान, अन्नदान आदींना फार महत्त्व आहे. धनदान, अन्नदान यापेक्षा जर नेत्रदान करून एखाद्या अंधव्यक्तीला दृष्टी दिली, तर हा दाता आयुष्यात आपल्या कर्तबगारीने खुप मोठा होईल. त्याच्या हातून हे एक श्रेष्ठ समाजकार्य देखील घडेल. १० जून हा जगभर दृष्टिदान दिवस म्हणून साजरा केला जातो; कारण त्या दिनाचे औचित्य साधून दृष्टिदानाचे स्मरण राहील. त्यामुळे मरणोत्तर नेत्रदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्ती आताच नेत्रपेढीत जाऊन विहित नमुन्याचा फॉर्म भरून दिला, की मरणोत्तर नेत्रदानाचे कार्य सत्कारणी लागेल. एखाद्या व्यक्तीच्या शरीराचे सर्व भाग महत्वाचे असतात, परंतु यामध्ये डोळ्यांना थोडे अधिक महत्त्व असते. डोळे ही देवाने दिलेली सर्वोत्कृष्ट अमूल्य देणगी आहे. ज्याचे डोळे नसतात त्यांच्याकडूनच त्याचे मूल्य चांगले समजू शकते. मृत्यूनंतर डोळे दान देऊन आपण कोणालाही नवीन जीवन देऊ शकतो. नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊनच दरवर्षी १० जून हा दिवस जगभर अंतरराष्ट्रीय दृष्टिदान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या माध्यमातून लोकांना नेत्रदानाचे महत्त्व सांगून नेत्रदानाची जनजागृती केली जाते. जागतिक नेत्रदान दिनाचे उद्दिष्ट व नेत्रदानाचे महत्व या बद्दलची जनजागृती करून लोकांना किंवा त्यांच्या नातेवाईकाच्या मृत्यूनंतर डोळे दानास प्रवृत्त करणे आहे. अंधत्व ही विकासशील देशांमध्ये प्रमुख सार्वजनिक आरोग्याच्या समस्यांपैकी मुख्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटना-डब्ल्यूएचओ अनुसार कार्निया संबंधित आजार, मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर होणाऱ्या दृष्टीहानी आणि अंधत्वाच्या मुख्य कारणांपैकी आहे.

सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ. आर. ए.भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस दृष्टिदान दिन म्हणून साजरा केला जातो. मृत्यूनंतर नेत्रदान करावे, याच्या प्रसारासाठी स्वयंसेवी संस्था पुढे सरसावत आहेत. आज २१व्या शतकातील विज्ञान इतके पुढे गेले आहे, की एका व्यक्तीचे डोळे आणि पर्यायाने त्याची दृष्टी घेऊन ते दुसऱ्याला म्हणजे ज्या व्यक्तीला दृष्टी नाही, अशा व्यक्तीला सहज देता येतात. त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. दान देणाऱ्या अशा व्यक्ती एकप्रकारे समाजसेवा करीत असल्याचे श्रेय त्यांना मिळते. अशा सामाजिक स्वरूपाच्या केलेल्या दानामुळे त्या व्यक्तीच्या मनाला शांती, सुख, समाधान व पुण्यही प्राप्त होते. डोळे ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी लखलाभ देणगी आहे; परंतु काही व्यक्ती यापासून वंचित असतात. काही कारणास्तव त्यांना अंधत्व प्राप्त होते. जन्मानंतर त्यांना अंधत्व येते. त्यामुळे अशा व्यक्ती जगाचे सौंदर्य पाहू शकत नाहीत. सौंदर्याने भरलेली सृष्टी ज्यांना पाहता येत नाही, ते या सृष्टीसौंदर्याला मुकतात. या व्यक्तींना नेत्र मिळाले, तर ते सृष्टीचा आस्वाद घेऊ शकतील.



माणुसकी या नात्याने दृष्टी असणाऱ्या व्यक्तीने दृष्टिहीन व्यक्तीला नेत्रदान केले, तर दात्याच्या जीवनाचे नक्कीच सार्थक होईल. मानवी जीवनात दृष्टीला प्रचंड महत्व आहे, कारण डोळे असले तर कोणतेही काम मनुष्य सहज करु शकतो. त्यामुळे दृष्टी आड सृष्टी किंवा असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी या म्हणी प्रचलित झाल्या आहेत. माणूस जगातील सृष्टिसौंदर्य आपल्या चक्षुंद्वारे अंतःकरणात साठवून ठेवू शकतो. त्यामुळे मानवाच्या पंच इंद्रियांमध्ये डोळ्यांना मानाचे स्थान आहे.

डोळ्यांचा उपयोग नयनरम्य, मनोहर सृष्टीसौंदर्य आस्वाद घेण्याबरोबर त्यांची छबी सुंदर चित्राद्वारे इतरांनाही देता येते. दृष्टीहिन मानवाला नयनसुख मिळून जगाच्या सौंदर्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी नेत्रदान, डोळेदान किंवा दृष्टिदान करण्याचा निर्णय प्रत्येक मानवाने केल्यास त्याचा फायदा जगातील नेत्रहीन मानवास निश्चितच होवू शकेल. अर्थात व्यक्तीने मरणोत्तर नेत्रदान केल्यास मानवी जीवनात त्याचा उपयोग अंध व्यक्तीस निश्चितच होईल. डोळ्यांमुळे माणसांच्या चेहऱ्यावरील हावभाव, स्वभाव प्रत्येक व्यक्ती सहज ओळखू शकतो. त्यामुळेच विविध भाषांमध्ये डोळ्यांच्या विशेषणांची गाणी तयार झाली आहेत. उदा. 'डोळ्यात वाच माझ्या तू' गीत भावनांचे, 'डोळे हे जुलमी गडे रोखूनी मज पाहू नको' आदी. डोळे माणसाला सौंदर्याबरोबरच अनेक गोष्टी शिकवतात. ते इतर अवयवांपेक्षा अधिकची माहिती माणसाला देतात, जसे की चेहरेपट्टी वरून ओळखला जाणारा व्यक्तीचा स्वभाव, कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याची दृष्टी त्यातून घेतला जाणारा बोध, त्यामुळे दृष्टिदानाचे महत्व चटकन माणसाला जाणवते.

दृष्टीहीन या सर्व गोष्टींना मुकतो, त्याच्या जीवनातील अंधार दूर होण्यासाठी किमान प्रत्येक व्यक्तीने मरणोत्तर नेत्र दान करण्याचा संकल्प केला पाहिजे. भारत सरकारने यासाठी विविध योजना हाती घेतल्या आहेत. दृष्टिविकार प्रतिबंधक आणि अंधत्व नियंत्रण कार्यक्रम हा शंभर टक्के केंद्र सरकार पुरस्कृत असून अनेक नेत्रपेढ्या, फिरती नेत्रपथके कार्यरत आहेत. राज्यात सुमारे नऊ लाखांपेक्षा जास्त अंध व्यक्ती असून या नेत्रदान जागृतीमार्फत लाखो व्यक्तींना दृष्टी प्राप्त होऊ शकते. सन १९७९ नंतर अंधत्व निवारणासाठी नेत्रशिबीर कार्यक्रम घेण्यात आले आहेत. महाराष्ट्रात जवळजवळ १३ नेत्रचिकित्सक पथके स्थापन करण्यात आली आहेत. नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान मानण्यात आले आहे; शिवाय नेत्रदान हे मृत्यूनंतर करायचे असल्याने कसलीच भीती नाही. नेत्रदानासाठी व्यक्तीच्या मृत्यूनंतर दोन तासांच्या आत डोळे काढले गेले पाहिजेत. नेत्रदान करणाऱ्या त्याच्या नातलगांकडून पूर्ण प्रक्रिया करून घेण्याची जबाबदारी सोपवावी; म्हणून जिवंतपणी त्या व्यक्तीने संबंधित नातेवाइकांना ही जबाबदारी सोपवून तशी विहित फॉर्मवर नोंद करावी. टाइम्स आय रिसर्च फाउंडेशनच्या एका पाहणीनुसार ५.५ लाख नेत्रदात्यांपैकी १५ ते ४० वयोगटातील, तर केवळ ४ टक्के व्यक्ती ही ६० वर्षांवरील वयोगटातील आहेत, तर हे प्रमाण वाढणे ही काळाची गरज आहे. !! विश्व नेत्रदान दिनानिमित्त सर्वांना संपूर्ण सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

– संकलन व सुलेखन –

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

(सामाजिक कार्यकर्ते, लेखक व कवी) रामनगर- गडचिरोली, ता. जि. गडचिरोली.

# ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे नळविहिरा येथे मासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांचे शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरणेने उभारलेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने दर महिन्याच्या ९ तारखेला आयोजित करण्यात येणारे नियमित मासिक चर्चासत्र मंगळवार दि. ९ जून २०२६ रोजी मौजे नळिवहिरा येथील पाटील स्मृती, पाटील कृषी फार्म, दमयंती नगरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात शिवारफेरीने झाली. उपस्थित शेतकरी बांधवांनी फार्मवरील विविध पीकपद्धती, फळबाग, सेंद्रिय शेतीचे प्रयोग, मुलस्थानी जलसंधारणाचे प्रयोग तसेच कमी खर्चातील शेती तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष पाहणी केली. शिवारफेरीदरम्यान शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडले तसेच विविध विषयांवर चर्चा केली.

चर्चासत्राची सुरुवात मातृवंदनेने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे नैसर्गिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी संघाच्या कार्याचा आढावा घेत शेतकऱ्यांमध्ये ज्ञान, संशोधन व अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्याचे महत्त्व विशद केले. या चर्चासत्रासाठी श्री. अमोलजी शिंदे (तालुका कृषी अधिकारी, जाफराबाद), श्री. ज्ञानेश्वरजी इधाटे (विभागीय समन्वयक, पाणी फाउंडेशन) आणि श्री. भगवानरावजी डोंगरे (चेअरमन, आयडियल ॲग्रीटेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, सावरगाव हडप) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना श्री. अमोलजी शिंदे यांनी शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा तसेच उत्पादन खर्च कमी करण्यासाठी वैज्ञानिक शेती पद्धती स्वीकाराव्यात, असे आवाहन केले. श्री. ज्ञानेश्वरजी इधाटे यांनी जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि सामुदायिक सहभागाचे महत्त्व पटवून दिले. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. श्री. भगवानरावजी डोंगरे यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका, सामूहिक विपणन, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेतील संधी याविषयी मार्गदर्शन केले. संघटित प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चर्चासत्रात उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील अनुभव, अडचणी आणि यशोगाथा मांडल्या. विविध पिकांचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेती, फळबाग लागवड, बाजारपेठेतील बदल आणि शेतकरी संघटन शक्तीची भूमिका या विषयांवर मुक्त चर्चा झाली. कार्यक्रमास पाणी फाउंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी श्री. असलम बेग, श्री. किशोर इंगोले, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. स्वप्नील पाटील, गेवराईचे श्री. अनिकेत तौर, वखारीचे श्री. रामप्रसाद खैरे, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, डोलखेडा खुर्दचे श्री. भानुदासराव डोईफोडे, टेंभुर्णीचे श्री. जगन्नाथनाना देशमुख, गोंधनखेडचे श्री. संजय बोऱ्हाडे, नळिवहिरा येथील श्री. ज्ञानेश्वर गाडेकर, श्री. हरिष मोरे, डॉ. स्वराज मोरे, श्री. संदेश मोरे, श्री. दिगांबर मोरे, श्री. युवराज मोरे, महादू गाडेकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. त्यानंतर उपस्थितांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला.

'साद तुमची, साथ आमची' या ब्रीदवाक्याने कार्यरत असलेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना एकत्र आणून ज्ञान, संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी अशा चर्चासत्रांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## समाजहितासाठी उद्योग क्षेत्राचे योगदान प्रेरणादायी

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून 'कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

# श्रमशक्ती व असंघटित क्षेत्रातील उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणास प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

रोजगार, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांची अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयामार्फत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण २०२६ तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण २०२६ राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्वेक्षणास आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत या कार्यक्रमास सह आयुक्त नियोजन एस.बी. वरसाळे, जिल्हा सांख्यिकी अधिकारी नरेंद्र कदम, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, सहा. नियोजन अधिकारी लक्ष्मीकांत थोंटे तसेच अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**श्रमशक्ती सर्वेक्षण**

नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण अंतर्गत श्रम शक्ती सहभाग दर, कामगार-लोकसंख्या गुणोत्तर आणि बेरोजगारी दर यांसारखे प्रमुख श्रमबाजार निर्देशांक तयार केले जातात. हे निर्देशांक ग्रामीण व शहरी भागांसाठी मासिक, त्रैमासिक तसेच वार्षिकस्तरावर प्रसिद्ध केले जाणार आहेत. याशिवाय, विविध वयोगट, लिंग, शिक्षणाची पातळी, रोजगार स्थिती, उद्योग व व्यवसाय यानुसार सविस्तर आकडेवारी वार्षिक अहवालाद्वारे उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**असंघटीत क्षेत्राचे सर्वेक्षण**

तसेच भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण असलेल्या असंघटित क्षेत्राची आर्थिक व कार्यात्मक माहिती संकलित करण्यासाठी असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण २०२६ हे सर्वेक्षण आयोजित करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रांतील असंघटित, बिगर-कृषी आस्थापनांचा समावेश असेल. या सर्वेक्षणातून रोजगार निर्मिती, उत्पादन, उत्पन्न, व्यवसायाची स्थिती आणि राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान याबाबतची महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे.

ही पाहणी 'महास्ट्राईड' प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेच्या सहकार्याने आणि अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. या पाहणीचे क्षेत्रीय कामकाज आयपीएसओएस या बाह्य संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

या सर्वेक्षणातून संकलित केलेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते. तरी सर्वेक्षणास आलेल्या प्रगणकांना सहकार्य करावे.

निवडलेल्या कुटुंबांनी व आस्थापनांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अधिकृत प्रगणकांना योग्य व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# दिव्यांग व्यक्तींनी स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा परिषदेच्या,सहायक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी स्वयंरोजगारासाठी 'बीज भांडवल योजना २०२६-२७' साठी अर्ज मागवण्यात आले आहेत.दि. १० जून २०२६ ते २० जुलै २०२६या दरम्यान अर्ज दाखल करण्याचे आवाहन श्री. बाबासाहेब अरवत, सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, यांनी केले आहे.

अर्ज प्रक्रिया दरवर्षीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने राबवली जाणार आहे. ही योजना बँकेमार्फत राबवली जाते. बँकेच्या नियमानुसार १.५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्यानंतर, दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून मंजूर कर्जाच्या २०% रक्कम सबसिडी (अनुदान) म्हणून दिली जाते. योजनेसाठी दिव्यांग प्रवर्गातील अंध, कर्णबधीर आणि अस्थिव्यंग व्यक्ती अर्ज करू शकतात.

मात्र, मतिमंद (बौद्धिक अक्षम) प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना यासाठी अर्ज करता येणार नाही.अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांच्या दरम्यान असावे.

अर्जदाराने अर्जासोबत तहसीलदार यांचे मार्च २०२७ पर्यंत वैध असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, तहसीलदार यांनी निर्गमित केलेले अर्ज दाराचे रहिवासी प्रमाणपत्र, बेरोजगार प्रमाणपत्र व ठराविक व्यवसायासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र'. रेशन कार्ड, मतदान कार्ड, आधार कार्ड. ४०% किंवा त्याहून अधिक टक्केवारीचे दिव्यांग प्रमाणपत्र. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो. व्यवसायाचे कोटेशन व प्रकल्प अहवाल.

जागेबाबत भाडे पावती, करारनामा किंवा मालकी हक्काचा पुरावा. ही कागदपत्रे आवश्यक आहेत. अर्जदारांनी अर्जातील सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचूनच अर्ज करावा आणि आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज 'दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय' येथे १० जून २०२६ ते २० जुलै २०२६या दरम्यान दाखल करावा.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यक्षेत्रातील दिव्यांग बांधव-भगिनींनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. बाबासाहेब अरवत, सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# रेल्वे स्टेशन परिसरात अनोळखी इसमाचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथील बुकिंग ऑफिससमोरील एस.बी.आय. एटीएम लगत एक अनोळखी इसम आज बेशुद्धावस्थेत आढळून आला होता. प्रकृती गंभीर असल्याने त्याला तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्या व्यक्तीला मृत घोषित केले.

या प्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, पोलिसांनी नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे. वय अंदाजे ५०वर्षे रंग, सावळा,नाक बसके, केस काळे, पोशाख, काळसर रंगाची पँट घातलेली असून या वर्णनाच्या व्यक्तीबाबत कोणाकडे काहीही माहिती असल्यास, त्यांनी तत्काळ वेदांत नगर पोलीस ठाण्याशी किंवा सहायक फौजदार व्हि. के. चव्हाण यांच्याशी ९७६७१७०११० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# 'स्वाधार' योजनेच्या लाभासाठी शासकीय वसतिगृहासाठी अर्ज बंधनकारक

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना आता प्रक्रियेचे पालन करावे लागणार आहे.

शासनाच्या नवीन निर्देशानुसार, थेट स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल. ज्या विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेनुसार वसतिगृहात होईल, त्यांना तिथे प्रवेश दिला जाईल. मात्र, केवळ ज्या विद्यार्थ्यांना जागेअभावी किंवा गुणवत्तेमुळे शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणे शक्य होणार नाही, अशाच विद्यार्थ्यांना 'स्वाधार' योजनेचा लाभ दिला जाईल. जे विद्यार्थी वसतिगृहासाठी अर्जच करणार नाहीत, त्यांना दोन्ही योजनांपासून वंचित राहावे लागेल.

ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे उपलब्ध नाहीत, तिथे हा नियम शिथिल ठेवण्यात आला असला तरी, भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी मागील परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत, ते विद्यार्थी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करू शकतात. शालेय अभ्यासक्रम ३० जून २०२६ आणि ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम यासाठी १५ जुलै २०२६ पर्यंत

संबंधित विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपले प्रस्ताव ऑनलाईन सादर करावेत, मुदतीनंतर सादर होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याने विद्यार्थ्यांनी वेळेत तातडीने अर्ज करावेत.

### पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण कामगिरी

# 'पी. ई. एस.च्या वंशिका कांबळेने भूतानमध्ये तिरंगा फडकवत भारताला मिळवून दिले सुवर्णपदक'

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दिनांक २ ते ४ जून २०२६ दरम्यान भूतान येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत भारतीय महिला संघाने शानदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या विजेत्या भारतीय संघात मराठवाड्यातील एकमेव खेळाडू म्हणून वंशिका उज्वला अनिल कांबळे हिची निवड झाली होती. वंशिका ही सध्या पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण घेत असून तिच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

क्रीडा क्षेत्राचा समृद्ध वारसा लाभलेल्या कांबळे कुटुंबातील वंशिकाने लहानपणापासूनच आट्यापाट्या खेळात विशेष प्राविण्य मिळवले आहे.

भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करताना तिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून संघाच्या सुवर्णपदक विजेतेपदात मोलाचे योगदान दिले. तिच्या या यशामुळे संपूर्ण मराठवाड्यासह महाराष्ट्राचा गौरव वाढला



आहे. वंशिकाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत वाडेकर यांनी तिचे विशेष अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, 'वंशिकाने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक मिळवणे ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेल.'

महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी वंशिकाचे अभिनंदन करून तिच्या पुढील क्रीडा कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. महाविद्यालय परिसरात तिच्या यशाबद्दल आनंदाचे वातावरण असून विद्यार्थ्यांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भारतीय महिला आट्यापाट्या संघाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल राज्यभरातून कौतुक होत असून, वंशिका कांबळेच्या या सुवर्ण कामगिरीमुळे पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे.

# बीड ते मंत्रालय मुंबई पर्यंत निघालेल्या पैदल लॉर्ग मार्चमध्ये आंरिमो पुणेपासून सामील होणार -नारायण बागडे



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आरक्षण उपवर्गिकरण हे या देशातील अनुसूचित जाती, जमाती यांच्या करिता धोक्याची घंटा आहे हि घंटा आमच्यातील कोणी कोणी पकडली आहे. यांना सबक शिकवण्यासाठी चळवळीतील कार्यकर्त्यांनी नेत्यांना झुगारून मोठ्या हिमतीने बीड ते मंत्रालय मुंबई पर्यंत लॉर्ग मार्च काढला आहे याला समर्थन म्हणून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा ने कंबर कसली आहे आंरिमो मोठ्या ताकदीने पुणे पासून या लॉर्ग मार्च मध्ये हजारो महिला पुरुष कार्यकर्त्यांना सोबत घेऊन सामिल होणार आहे, असे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी संभाजीनगर येथून घोषणा केली आहे.

मार्च मध्ये मराठवाडा, कोकण, खानदेश, विदर्भ आणि मुंबई प्रदेश चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सामील होणार आहे याची पुर्व तयारी मराठवाडा प्रदेश अध्यक्ष बापु सैय्यद अली यांनी केली आहे पुणे येथे लॉर्ग मार्च मध्ये येणाऱ्या भिम सैनिकांच्या स्वागताची जय्यत तयारी आंबेडकरी महिला मोर्चा अध्यक्षा कविता गाडगे यांनी जेवण्याची राहण्याची व्यवस्था सोय केली आहे या करिता पुणे येथील आंरिमोचे शहरं जिल्हा अध्यक्ष पदाधिकारी सागर वानखेडे, लक्ष्मी वानखेडे,नरेश लोट, कमलाकर गायकवाड, सुनंदा कांबळे, अनुजा पाटील उषा गायकवाड,सह कार्यकर्ते परिश्रम घेत आहे असे संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे यांनी माध्यमांसी संवाद साधताना सांगितले.

# स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

**रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना** – रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

**आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी**

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या 'सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# पीएम सेतू योजना:औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण; रोजगारक्षम कौशल्यासाठी जिल्ह्यातील उद्योगांचा सहभाग

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रधानमंत्री सेतू या योजनेअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण करुन रोजगारक्षम कौशल्य विकास करण्यात येणार आहे. त्यासाठी उद्योगांचा सहभाग घेतला जाणार आहे. जिल्ह्यातील पाच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची या योजनेसाठी निवड करण्यात आली असून सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होणार आहे.

यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., सहसंचालक व्यवसाय शिक्षण प्रदीप दुर्गे, उपसंचालक रमण पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अभिजीत आलटे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार सत्यभूषण गोसावी आदी उपस्थित होते.

पीएम सेतू ही केंद्र पुरस्कृत योजना असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण करुन त्यांचे आधुनिक, उद्योगाभिमुख व रोजगारक्षम कौशल्य संस्थांमध्ये रुपांतरीत करणे हा उद्देश आहे. त्यानुसार जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर आणि पैठण,गंगापुर, फुलंब्री व खुलताबाद येथील आयटीआय अशा पाच संस्थांचे मिळून एक क्लस्टर विकसित केले जाणार आहे. या पाच आयटीआय मध्ये मिळून शिकणाऱ्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना या रोजगारक्षम कौशल्य विकास प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाचा ५० टक्के, राज्य शासनाचा ३३ टक्के व उद्योगांचा १७ टक्के निधी खर्च केला जाणार आहे.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात विकसित करावयाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निवड झाली असून पुढील टप्प्यात उद्योगांचा सहभाग मिळिवला जाणार आहे. त्यासाठी एमआयडीसी, जिल्हा उद्योग केंद्र आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत संयुक्त प्रयत्न केले जातील.

उद्योगांशी समन्वय तयार करुन उद्योगांना आवश्यक कौशल्यनुसार रोजगारक्षम अभ्यासक्रम तयार करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल,असे यावेळी सांगण्यात आले.

# कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला मोठा दिलासा!

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र सरकारने कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने काढलेल्या जीआरमुळे पारंपारिक व्यवसायाला मोठा दिलासा मिळणार आहे. यांच्या महसूल विभागाने कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी म हत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांच्या लेखी पूर्वपरवानगीने आणि कोणतेही शुल्क अथवा स्वामित्वधन (ठेूरश्रीं) न भरता, पिढीजात कुंभार कुटुंबांना विटा, कौले व इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी वर्षाकाठी ७०० ब्रासपर्यंत माती काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. यासह कुंभार समाजासाठी अनेक महत्वाच्या सुविधांचा या निर्णयात समावेश आहे.

कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि पारंपरिक व्यवसायाच्या जतनासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

जीआरनुसार महाराष्ट्राचा रहिवासी असलेली आणि पारंपारिक पिढीजात कुंभार व्यवसाय करणारी व्यक्ती राज्यातील कोणत्याही भागात या सवलतींचा लाभ घेण्यास पात्र राहणार आहे.

**महसूल मंत्री बावनकुळे यांनी थेट जीआरच काढला**



हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199